# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


दिनांक 18/07/2023 (मंगळवार) सायंकाळ

---

### पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

पो.स्टे. बोरी – दिनांक १६/०७/२०२३ चे २१.०० वा. ते दिनांक १७/०७/२०२३ चे ०५.०० वा. दरम्यान पो.स्टे. बोरी हद्दीत फिर्यादीची अल्पवयीन मुलगी वय १७ वर्ष ११ महिने ही दिनांक १६/०७/२०२३ चे सायंकाळी ०६.०० वा. घरी कुणालाही न सांगता घरून निघुन गेली. ती आजपावेतो घरी परत आली नाही. तिचा आजुबाजुला व मित्र मैत्रिणीकडे शोध घेतला मिळून आली नाही. मुलीचे गावातील संशयीत **आरोपी नामे– अमीत धुर्वे रा. आजनगाव हिंगणा बोरी** याचेसोबत प्रेमसंबध आहे असे समजले अमीत धुर्वे हा सुध्दा घरी नसल्याचे समजले त्याने फिर्यादीच्या मुलीला फूस लावून पळवुन नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. बोरी येथे आरोपीविरुध्द कलम ३६३ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार मांढरे पोस्टे बोरी हे करीत आहे.

### दुखापत

पो.स्टे. पारशिवनी :– अंतर्गत ०३ किमी अंतरावर मौजा चौकी फाटा सरोदी टोला पालोरा ता. पारशिवनी जि. नागपूर येथे फिर्यादी नामे– रंगलाल नवसु भोयर, वय ७० वर्षे रा. एम. जी. कॉलेज जवळ चौकी फाटा सरोदी टोला पालोरा ता. पारशिवनी जि. नागपूर व आरोपी नामे– ०१) सिकंदर रघूनाथ भोयर ०२) रमेश भोयर ०३) राजा भोयर सर्व रा. पिपळा रोड सरोदी टोला पालोरा ता. पारशिवनी जि. नागपूर हे नातेवाईक असून फिर्यादीचा लहान मुलगा याचेसोबत भांडण सुरू असतांनी फिर्यादी व फिर्यादीची पत्नी हे मध्यस्थी जावून चौकी फाटा याला खराब का म्हणतो असे हटकले असता आरोपी क्र. ०१ याने फिर्यादीचे उजव्या हाताचे दंडावर कोणत्यातरी धारदार शस्त्राने मारून जखमी केले. तसेच आरोपी क्र. ०२ याने फिर्यादीच्या पत्नीस ढकलढूकल केल्याने खाली पडल्याने तिचे डोळयाचेवर जखम झाली फिर्यादीच्या लहान मुलाला आरोपी क्र. ०१ ते ०३ यांनी कोणत्यातरी शस्त्राने व काठीने मारल्याने त्याचे डावे हाताचे अंगठयाला मारल्याने जखमी केले. तसेच फिर्यादी त्याचे पत्नीस व दोन्ही मुलांना शिवीगाळ करून जिवाने मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. पारशिवनी येथे आरोपीतांविरुध्द कलम ३२४, ५०४, ५०६, ३४ भादवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक आकरे मो. क्र. ९८२३७१५७९५ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर